THE

# Bombay Government Gazette.

**Published by Authority.**

THURSDAY, 7TH SEPTEMBER 1893.

☞ *Separate paging is given to this Part, in order that it may be filed as a separate compilation.*

## PART IX.—Marathi Acts, &c.

### रेव्हेन्यू डिपार्टमेंट.

मुकाम जंजिरे मुंबई, तारीख २२ माहे एप्रिल सन १८९०.

नंबर २७४३.—पिट्रोलियम आक्ट नामक सन १८८६ चा आक्ट १२ वा ह्याच्या ८ व्या कलमांत दिलेले अधिकार चालवून, मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल ह्यांनीं, गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांची आधीं मंजुरी आणवून, मुंबई इलाक्यांत समुद्रमार्गानें पिट्रोलियम आणण्याचें नियमन करण्याकरितां खालीं दिलेल्या कानू केल्या आहेत:—

### प्रथमारंभींचे ठराव.

१. ह्या कानूंस "मुंबईच्या पिट्रोलियम आंत आणण्याबद्दल कानू" असें ह्मणावें. लहान सरनामा.

२. ह्या कानूंत— अर्थ.

(१) "सदर्हू आक्ट" ह्या संज्ञेचा अर्थ, सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट असा आहे: "सदर्हू आक्ट"

(२) "भयकारक ह्मणून इकरार केलेलें पिट्रोलियम" ह्या संज्ञेचा अर्थ, कानू ९ अन्वयें कोणत्याही तारवाच्या मास्तरानें भयकारक ह्मणून इकरार केलेलें पिट्रोलियम, असा आहे: "भयकारक ह्मणून इकरार केलेलें पिट्रोलियम."

(३) "दाखल्याचें पिट्रोलियम" ह्या संज्ञेचा अर्थ, गव्हर्नर इन् कौन्सिल हे, वेळोवेळीं ठराव करून, पिट्रोलियमबद्दलचा ज्या प्रकारचा दाखला ह्या कानूंच्या कारणांसाठीं कबूल करण्याची परवानगी आहे ह्मणून ठरवितील त्या प्रकारचा पिट्रोलिमय भयंकर नाहीं अशा इकराराचा दाखला ज्या पिट्रोलियमबद्दल तें पिट्रोलियम ज्या बंदरीं तारवावर चढविलें असेल त्या बंदरांतून दिलेला असेल, तें पिट्रोलियम, असा आहे: "दाखल्याचें पिट्रोलियम."

(४) "बिन-दाखल्याचें पिट्रोलियम" ह्या संज्ञेचा अर्थ, जें पिट्रोलियम भयकारक ह्मणून इकरार केलेलें पिट्रोलियम नाहीं आणि जें दाखल्याचेंही पिट्रोलियम नाहीं, तें पिट्रोलियम, असा आहे: "बिन-दाखल्याचें पिट्रोलियम."

"भयकारक ह्मणून रिपोर्ट झालेलें पिट्रोलियम" आणि "भयकारक नव्हे असा रिपोर्ट झालेलें पिट्रोलियम."

(५) "भयकारक ह्मणून रिपोर्ट झालेलें पिट्रोलियम" आणि "भयकारक नव्हे असा रिपोर्ट झालेलें पिट्रोलियम" ह्या संज्ञांचा अर्थ, अनुक्रमें, जें पिट्रोलियम भयकारक असल्याबद्दल अगर भयकारक नसल्याबद्दल तपासणी-अमलदारानें कानू २३अन्वयें केलेल्या रिपोर्टांत दाखला दिला असेल, तें पिट्रोलियम, असा आहे:

"कस्टम्सचा मुख्य अमलदार."

(६) "कस्टम्सचा मुख्य अमलदार" ह्या संज्ञेचा अर्थ, ज्या कोणत्याही बंदरास ह्या कानू लागू असतील, त्या बंदराचा जलमार्गाचे कस्टम्सचें काम पाहणारा मुख्य एक्झिक्युटिव अमलदार, असा आहे;

"तपासणी-अमलदार."

(७) "तपासणी-अमलदार" ह्या संज्ञेचा अर्थ, मुंबईचे गव्हर्नर इन् कौन्सिल ह्यांनीं, सदर्हू आक्टाच्या ९ व्या कलमाअन्वयें, प्रसंगाप्रमाणें, मुंबई, कराची अगर एडन बंदराकरितां नेमिलेला तपासणी-अमलदार असा आहे: आणि

पिट्रोलियम आक्टांत व्याख्या केलेले शब्द व संज्ञा.

(८) सदर्हू आक्टांत व्याख्या केलेल्या ज्या शब्दांस आणि संज्ञांस जे अर्थ अनुक्रमे दिलेले आहेत, तेच अर्थ त्या शब्दांस आणि संज्ञांस आहेत.

## पिट्रोलियम ज्या बंदरामध्यें आणण्याचा अख्त्यार आहे तीं बंदरें.

ब्रह्मदेशांतील आणि परकी बंदरांहून आंत आणणें.

३. ब्रह्मदेशांतील कोणत्याही बंदराहून अगर ब्रिटिश हिंदुस्थानाच्या हद्दीबाहेरलि कोणत्याहीं बंदराहून पिट्रोलियम आणणें तें, मुंबई, कराची आणि एडन ह्यांशिवाय दुसऱ्या कोणत्याही बंदरामध्यें आणूं नये.

ब्रिटिश हिंदुस्थानांतील बंदरांहून आंत आणणें.

४. ब्रह्मदेशांतील बंदरांव्यतिरिक्त ब्रिटिश हिंदुस्थानांतील इतर कोणत्याही बंदरांहून पिट्रोलियम आणणें तें मुंबई इलाक्यांतलि कोणत्याही बंदरांमध्यें आंत आणावें.

मात्र इतकेंच कीं,—

(अ) असें पिट्रोलियम जर भयकारक पिट्रोलियम असलें, तर, —

(१) तें चाळीस ग्यालनांहून जास्त असल्यास त्याबरोबर त्याबद्दलचा सदर्हू आक्टाच्या ९ व्या कलमाखालीं दिलेला आंत आणण्याचा परवाना असला पाहिजे; अगर

(२) तें तीन ग्यालनांहून जास्त असून चाळीस ग्यालनांहून जास्त नसल्यास, त्याबरोबर त्याबद्दलचा सदर्हू आक्टाच्या ६ व्या कलमाखालीं दिलेला कबजांत ठेवण्याचा अगर एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा परवाना असला पाहिजे; अगर

(३) तें तीन ग्यालनांपेक्षां जास्त नसल्यास, तें सदर्हू आक्टाच्या ६ व्या कलमाच्या विशेष ठरावांत सांगितल्या प्रकारच्या पात्रांत ठेवलेलें असलें पाहिजे;

(ब) असें पिट्रोलियम जर भयकारक पिट्रोलियम नसलें, तर सदर्हू आक्टाच्या २व्या कलमाअन्वयें कोणत्याही स्थानिक सरकारानें नेमिलेल्या कोणत्याही तपासणी-अमलदारानें तें भयकारक नसल्याबद्दल दाखला दिलेला असला पाहिजे, आणि त्याबद्दलच्या शिपिंग बिलावर आणि एक्पोर्ट सतमीवर "भयकारक नाहीं" हे शब्द असले पाहिजेत;

## मुंबई, कराची आणि एडन ह्या बंदरांत आणल्यानंतर काय करावयाचें तें.

### (अ) तारवावर पिट्रोलियम किती आहे व कोणत्या प्रकारचें आहे ह्याबद्दल निर्णय.

पिट्रोलियम नेणाऱ्या तारवाच्या मास्तरानें अगर एजंटानें करार केला पाहिजे तो.

५. यांत पुढें उलट ठरविलें आहे ते प्रसंग खेरीजकरून इतर सर्व प्रसंगीं, पिट्रोलियम घेऊन मुंबईस, कराचीस अगर एडनास जाणाऱ्या प्रत्येक तारवाच्या मास्तरानें, तें तारूं खालीं निर्दिष्ट केलेल्या जागीं ह्मणजे—

मुंबईस,—संक रॉक लाइट हौस,

कराचीस,—नंबर २ डीप वाटर पाइंट मूरिंग,

एडनास,—जी जागा ह्या कानूच्या कारणासाठीं रेसिडेंट ठरवील ती जागा, येथें जाऊन पोंचण्यापूर्वी, खालीं निर्दिष्ट केलेल्या गोष्टींबद्दल ज्यांत माहिती आहे असा आपल्या सहीचा एक लेखी इकरार पैलटास दिला पाहिजे: त्या गोष्टी येणें-प्रमाणें:—

(अ) तें तारूं किती पिट्रोलियम नेत आहे;

(ब) त्यांतलें कांहीं पिट्रोलियम भयकारक पिट्रोलियम आहे किंवा कसें, आणि असल्यास तें किती आहे;

(क) त्यांतलें कांहीं पिट्रोलियम दाखल्याचें पिट्रोलियम आहे किंवा कसें, आणि असल्यास तें किती आहे; आणि

(ड) त्यांतलें कांहीं पिट्रोलियम केवळ ओंगण करण्याच्या अगर सणाच्या चाक्या बसविण्याच्या कारणांसाठीं असून फारनहीटच्या उष्णतामापक यंत्राच्या १९० ° अंशांहून जास्त उष्णता मानावर पेट घेणारें तेल आहे किंवा कसें, आणि असल्यास तें किती आहे;

मात्र इतकेंच कीं, अशा तारवाच्या एजंटानें तें तारूं येऊन पोंचण्याच्या आधीं आपल्या सहीचा सदहू प्रकारचा लेखी इकरार बंदर-अमलदाराच्या स्वाधीन केला तर, त्या तारवाच्या मास्तरानें सदहू प्रकारचा इकरार देणें जरूर नाहीं.

कोणतेंही पिट्रोलियम दाखल्याचें पिट्रोलियम असल्याबद्दल त्या मास्तरानें अगर एजंटानें इकरार केला तर, त्यानें, प्रसंगाप्रमाणें, पैलटास अगर बंदर-अमलदारास त्या इकराराबरोबर त्या पिट्रोलियमबद्दलचा दाखलाही दिला पाहिजे.

पैलटाच्या स्वाधीन केलेला असा प्रत्येक दाखला व इकरार त्यानें विलंब न लावितां बंदर-अमलदाराच्या स्वाधीन केला पाहिजे आणि बंदर-अमलदाराला पोंचलेले सर्व दाखले व इकरार त्यानें सोईप्रमाणें पाठवितां येतील तितके लवकर कस्टम्सच्या मुख्य अमलदाराकडे पाठविले पाहिजेत.

### (ब) पिट्रोलियम तारवांतून बोटींत उतरणें, जमिनीवर उतरणें, एका तारवावरून दुसऱ्या तारवावर चढविणें आणि दास्तानात ठेवणें.

तारवांतून आणिलेलें पिट्रोलियम जर—

पिट्रोलियम आणणाऱ्या तारवानें साधारण नांगर टाकण्याच्या जागीं नांगर केव्हां टाकावा तें.

(अ) सदहू आक्टाच्या ९व्या कलमाअन्वयें भयकारक नसल्याबद्दल दाखला दिलेलें पिट्रोलियम असेल, आणि इतर साधारण मालाबरोबर ब्रिटिश हिंदुस्थानांतील कोणत्याही बंदराहून आणिलेलें असून पांच हजार ग्यालनांपेक्षां जास्त नसेल, अगर

(ब) दाखल्याचें पिट्रोलियम असून पांच हजार ग्यालनांपेक्षां जास्त नसेल, आणि मास्तरानें त्याबद्दलचा दाखला पैलटाकडे दिलेला असेल, अगर

(क) वंगणाच्या कारणासाठीं अगर सणाच्या चाक्या बसविण्याच्या कारणासाठीं साधारणतः उपयोग करण्याचें पिट्रोलियम असून फारनहीटच्या उष्णतामापक यंत्राच्या १९० ° अंशांहून जास्त

उष्णतामानावर पेट घेणारें असेल,

तर, तें तारूं बंदरांतील साधारण नांगरण्याच्या जागीं नेऊन नांगरण्याचा आणि तेथें सदर्हू पिट्रोलियम बोटींत उतरण्याचा अख्त्यार आहे.

मात्र, तारवावरील पिट्रोलियमचे नमुने घेणें हें कानू २१ह्याअन्वयें ज्या अमलदाराचें काम आहे, त्या अमलदारास कोणत्याही वेळीं त्या पिट्रोलियमची अगर तेलाची तपासणी करण्यासाठीं त्याचे नमुने घेण्याचा अख्त्यार आहे.

पिट्रोलियम आणणाऱ्या तारवानें मुद्दाम नेमिलेल्या नांगरण्याच्या जागीं केव्हां नांगरलें पाहिजे तें.

७. ज्यावर पिट्रोलियम आहे असें इतर प्रत्येक तारूं, तें नांगरण्यास बंदराचा कान्सर्व्हेटर नांगरण्याची जी जागा नेमील, त्या जागीं नांगरलें पाहिजे, आणि त्यावरील पिट्रोलियम बोटींत उतरलें जाई तोंपर्यंत त्यानें ती जागा सोडतां कामा नये.

नेमिलेल्या जागीं मात्र पिट्रोलियम जमिनीवर उतरलें पाहिजे.

८. कस्टम्सचा मुख्य अमलदार सरकारच्या मंजुरीनिशीं मुंबईकरितां, सिंधच्या कमिशनरांच्या मंजुरीनिशीं कराचीकरितां, आणि एडन येथील रेसिडेंटाच्या मंजुरीनिशीं एडनकरितां पिट्रोलियम जमिनीवर उतरण्याच्या ज्या जागा ठरवील त्या जागीं मात्र पिट्रोलियम उतरलें पाहिजे.

कानू ७ ह्यांत सांगितलेलें पिट्रोलियम तपासणी करण्यांत आल्याशिवाय जमिनीवर उतरूं नये.

९. कानू १० व ११ ह्यांत इतर ठराव आहेत ते प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, ७व्या कानूंत उल्लेख केलेल्या कोणत्याही तारवांतून पिट्रोलियम जमिनीवर उतरणें तें, त्या पिट्रोलियमसंबंधाचा तपासणी-अमलदाराचा रिपोर्ट कस्टम्सच्या मुख्य अमलदाराच्या कचेरींत दाखल होई तोंपर्यंत उतरूं नये.

भयकारक ह्मणून इकरार केलेल्या परंतु चाळीस ग्यालनांपेक्षां जास्त नाहीं अशा अगर ज्या बरोबर तें आंत आणण्याचा लैसेन्स आहे अशा पिट्रोलियमबद्दल अपवाद.

१०. भयकारक ह्मणून इकरार केलेलें पिट्रोलियम तारवावर चाळीस ग्यालनांपेक्षां जास्त नसेल आणि त्या तारवावर दुसरें कोणतेंही पिट्रोलियम नसेल तर, अगर भयकारक ह्मणून इकरार केलेलें पिट्रोलियमधरून तारवावरचें एकंदर पिट्रोलियम चाळीस ग्यालनांपेक्षां जास्त नसेल, तर, तें एकदम जमिनीवर उतरण्याचा अख्त्यार आहे.

भयकारक ह्मणून इकरार केलेलें पिट्रोलियम तारवावर चाळीस ग्यालनांपेक्षां जास्त असेल, अगर तें चाळीस ग्यालनांपेक्षां जास्त नसून तारवावरील एकंदर सगळें पिट्रोलियम चाळीस ग्यालनांपेक्षां जास्त असेल, तर, तारवावरील सगळ्या पिट्रोलियमबद्दल सदर्हू आक्टाच्या ९ व्या कलमाअन्वयें आंत आणण्याचा परवाना असल्यास, तें सगळें पिट्रोलियम अगर त्याचा कोणताही भाग एकदम जमिनीवर उतरण्याचा अख्त्यार आहे.

पांच हजार ग्यालनांपेक्षां जास्त अशा दाखल्याच्या पिट्रोलियमबद्दल अपवाद.

११. कस्टम्सच्या मुख्य अमलदारास, तपासणी-अमलदाराचा रिपोर्ट होण्याच्या आधीं, पांच हजार ग्यालनांपेक्षां जास्त अशा दाखल्याच्या पिट्रोलियमच्या कन्सैनीस तें पिट्रोलियम बोटीमध्यें अगर जमिनीवर उतरण्यास परवानगी देण्याचा अख्त्यार आहे.

अशी परवानगी देणें ती अशा शर्तीवर द्यावी कीं, तें पिट्रोलियम ज्या बोटींमध्यें उतरलें जाईल त्या बोटी कस्टम्सचा मुख्य अमलदार फर्मावील त्या जागीं राहूं दिल्या पाहिजेत; किंवा ८ व्या कानूअन्वयें योग्य रीतीनें नेमिलेल्या एखाद्या उताराच्या जागीं तें पिट्रोलियम उतरून, पिट्रोलियम सांठवून ठेवण्याबाबत ज्या कोणत्याही कानू अमलांत असतील त्यांस अनुसरून बांधलेल्या आणि भयकारक नाहीं असा ज्याबद्दल रिपोर्ट झाला नसेल असें दाखल्याचें पिट्रोलियम सांठविण्याकरितां राखून ठेविलेल्या एखाद्या सरकारी वखारींत किंवा कस्टम्सचा मुख्य अमलदार ह्या कारणासाठीं ज्या हद्दी पसंत करील त्या हद्दींच्या आंत, सांठवून ठेविलें पाहिजे.

तें पिट्रोलियम अशा वखारींत नेण्यापूर्वीं, तें सन १८७८ चा जलमार्गाचे कस्टम्सचा आक्ट ह्याच्या ८६ व्या व ८७ व्या कलमांअन्वयें आवकबुकांत नोंदवून क्लियर केलें पाहिजे.

१२. तपासणी-अमलदाराचा रिपोर्ट कस्टम्सच्या मुख्य अमलदाराच्या कचेरींत पोंचला ह्मणजे, तो रिपोर्ट ज्या पिट्रोलियमसंबंधाचा असेल तें पिट्रोलियम त्या रिपोर्टांत भयकारक ह्मटलें असल्यास तसें आणि भयकारक नाहीं असें ह्मटलें असल्यास तसें समजलें जाईल. आणि भयकारक ह्मणून इकरार न केलेल्या पिट्रोलियमबद्दल भयकारक ह्मणून रिपोर्ट झाल्यास तें पिट्रोलियम भयकारक पिट्रोलियम संबंधाच्या ठरावांस एकदम पात्र होईल.

तपासलेल्या पिट्रोलियम संबंधानें तपासणी-अमलदाराचा रिपोर्ट कायमचा समजला पाहिजे.

१३. भयकारक नाहीं ह्मणून रिपोर्ट झालेलें पिट्रोलियम एकदम जमिनीवर उतरण्याचा अख्त्यार आहे.

भयकारक नाहीं ह्मणून रिपोर्ट झालेलें पिट्रोलियम जमिनीवर उतरणें.

१४. भयकारक ह्मणून रिपोर्ट झालेलें पिट्रोलियम आणि भयकारक ह्मणून इकरार केलेलें पिट्रोलियम तारवावर असल्यास तें, हीं दोन्ही मिळून चाळीस ग्यालनांपेक्षां जास्त असून १० व्या कानूच्या दुसऱ्या पारिग्राफाअन्वयें आधींच जमिनीवर उतरलेलीं नसलीं तर, सदहू आक्टाच्या ९ व्या कलमाअन्वयें त्या सगळ्या पिट्रोलियमबद्दल आंत आणण्याचा परवाना हजर केल्याशिवाय त्या पिट्रोलियमचा कोणताहि भाग जमिनीवर उतरूं दिला जाणार नाहीं.

चाळीस ग्यालनांपेक्षां जास्त भयकारक पिट्रोलियम, आंत आआणण्याच्या परवान्याशिवाय जमिनीवर उतरूं नये.

१५. सदहू कलमाअन्वयें आंत आणण्याच्या परवान्यासाठीं अर्ज करणें ते, मुंबई शहरांत कमिशनर आफ् पोलीस ह्यांकडे, एडन शहरांत तेथील रेसिडेंटाकडे, आणि कराची शहरांत तेथील कलेक्टर आफ् कस्टम्स ह्यांकडे केले पाहिजेत; ह्मणजे हे अमलदार त्या अर्जाबद्दल तपास करून, ते अर्ज आपल्या अभिप्रायासहवर्तमान, सरकारास रेव्हेन्यू डिपार्टमेंटांत पाठवितील.

आंत आणण्याचे परवाने कसे मिळवावे तें.

अर्ज मंजूर झाल्यास, सेक्रेटरी निसवत सरकार ह्यांच्या सहीचा एक परवाना, अर्जदारानें ज्या अमलदाराकडे अर्ज केला असेल, त्या अमलदारामार्फत अर्जदाराकडे पाठविला जाईल.

१६. सूर्यास्त व सूर्योदय ह्या वेळांच्या दरम्यान कोणत्याही वेळीं पिट्रोलियमं तारवांतून बोटींत उतरूं नये, जमिनीवर उतरूं नये किंवा एका तारवावरून दुसऱ्या तारवावर चढवूं नये.

पिट्रोलियम तारवांतून बोटींत उतरणें, वगैरे काम दिवसा मात्र करावें.

१७. पिट्रोलियम जमिनीवर उतरण्यासाठीं किंवा एका तारवावरून दुसऱ्या तारवावर चढविण्यासाठीं ज्या कोणत्याही होडीचा उपयोग करण्यांत येत असेल, त्या होडीवर तंबाखूवगैरे ओढण्याची आणि कोणत्याही विस्तवाचा अगर दिव्याचा उपयोग करण्याची मनाई आहे.

पिट्रोलियम भरलेल्या होड्यांवर तंबाकू वगैरे ओढण्याची, आग करण्याची, वगैरे मनाई.

१८. पिट्रोलियम हें कोणत्याही उतरण्याच्या जागेंत अगर जागेजवळ रचून न ठेवतां, विलंब लाविल्याशिवाय त्याच्या नेमिलेल्या योग्य जागीं नेलें पाहिजे.

उतरण्याच्या जागीं अगर आसपास पिट्रोलियम रचून ठेवूं नये.

१९. कानू १६ व १७ ह्यांत इतर प्रकारचे ठराव आहेत ते प्रसंग खेरीज करून इतर प्रसंगीं, दाखल्याचें पिट्रोलियम अगर सदहू आक्टाच्या ९ व्या कलमाअन्वयें भयकारक नसल्याबद्दल दाखला दिलेलें पिट्रोलियम ब्रिटिश हिंदुस्थानाच्या हद्दींतील अगर हद्दींबाहेरील दुसऱ्या कोणत्याही बंदरीं नेण्याकरितां एका तारवांतून काढून दुसऱ्या तारवावर चढविणें तें, जलमार्गाचे कस्टम्सचा आक्ट ह्याखालीं केलेल्या कानूंतील निर्बंधाशिवाय दुसऱ्या कोणत्याही निर्बंधांस पात्र राहाणार नाहीं.

पिट्रोलियम एका तारवांतून दुसऱ्या तारवावर चढविणें.

२०. भयकारक पिट्रोलियम आणि पांचशें ग्यालनांपेक्षां जास्त पिट्रोलियम, सदहू आक्टाच्या ११ व्या कलमाअन्वयें ज्या कोणत्याही जागेस परवाना दिलेला नसेल, त्या जागेंत सांठवून ठेवितां कामा नये.

पिट्रोलियम सांठविणें.

## नमुने काढणें आणि काढलेले नमुने स्वाधीन करणें.

*नमुने काढणें.*

२१. कानू ७ ह्यान्वयें नेमिलेल्या नांगरण्याच्याजागीं कोणतेंही तारूं नांगर टाकून उभें केलें ह्मणजे, मुंबई येथें प्रिव्हेंटिव सर्व्हिसच्या सुपरिंटेंडटानें अगर त्या सर्व्हिसमधील कोणत्याही इन्सपेक्टारानें, कराची येथें हेड प्रिव्हेंटिव आफिसरानें आणि एडन येथें अबकारीच्या कलेक्टराचा हुकुम असलेल्या अबकारी इन्स्पेक्टरानें त्या तारवावर जाऊन, होईल तितकें लवकर, भयकारक ह्मणून इकरार केलेलें पिट्रोलियम शिवाय करून ज्या ज्या इतर जातीचें पिट्रोलियम त्या तारवावर असेल, त्या प्रत्येक जातीच्या पिट्रोलियमचे नमुने काढिले पाहिजेत.

*मास्तरानें नमुने स्वाधीन करणें.*

तो अमलदार जे कोणतेही नमुने काढील, ते, त्यांबद्दल पैसा मुळींच न घेतां, त्या तारवाच्या मास्तरानें त्या अमलदाराच्या स्वाधीन केले पाहिजेत.

*नमुने तपासणी-अमलदाराकडे पाठविणें.*

सदर्हू प्रमाणें मिळविलेल्या प्रत्येक नमुन्यावर सदर्हू अमलदारानें तावडतोब मोहोर केली पाहिजे, आणि त्या नमुन्याला त्या तारवाचें नांव, त्या पिट्रोलियमच्या कन्सैनीचें नांव, आणि आपणास योग्य वाटेल तो इतर तपशील अगर ओळखतां येण्यासारख्या खुणा लावून तो तपासणी-अमलदाराकडे रिपोर्टासाठीं पाठविला पाहिजे.

*काढावयाच्या नमुन्यांची संख्या.*

२२. नमुने काढणें ते, त्या तारवावरील पिट्रोलियम ज्या ज्या निशाणीचें अगर जातीचें असेल त्या प्रत्येक निशाणीच्या अगर जातीच्या पिट्रोलियमच्या बाबतींत, दाखल्याच्या पिट्रोलियमच्या प्रसंगीं दर पंधराहजार अगर त्यांहून कमी पेट्यांस एक नमुना, आणि दाखला नसलेल्या पिट्रोलियमच्या प्रसंगीं दर दाहाहजार अगर त्यांहून कमी पेट्यांस एक नमुना, ह्या प्रमाणानें काढिले पाहिजेत.

### (ड) तपासणी.

*तपासणी-अमलदाराचा रिपोर्ट.*

२३. तपासणी-अमलदारानें, तपासणी पुरी केल्यानंतर होईल तितकें लवकर, आणि साधारणतः, नमुने पोंचल्यानंतर चोवीस तासांच्या आंत, प्रसंगाप्रमाणें, ते नमुने भयकारक पिट्रोलियम असल्याबद्दल अगर भयकारक पिट्रोलियम नसल्याबद्दल कस्टम्सच्या मुख्य अमलदाराकडे पाठवावयाच्या रिपोर्टावर सही केली पाहिजे.

*तपासणीच्या-निकालाची सरासरी काढणें.*

२४. कोणत्याही तारवांतला सगळा माल अगर मालाचा कांहीं भाग एकाच निशाणीचें अगर जातीचें पिट्रोलियम असून त्या पिट्रोलियमचे एकाहून जास्त नमुने तपासणी-अमलदाराकडे रिपोर्टाकरितां पाठविण्यांत आले तर, त्या अमलदारानें त्यांतल्या प्रत्येक नमुन्याची निरनिराळी तपासणी करावी, आणि त्या नमुन्यांचे जे निकाल येतील त्या सर्वांची एक सरासरी काढावी. ह्याप्रमाणें काढलेला सरासरीचा ज्वलनबिंदु फारन्हीटच्या उष्णतामापक यंत्राच्या ७३° व्या अंशांहून कमी नसला ह्मणजे, आणि त्या नमुन्यांपैकीं कोणत्याही नमुन्याचा ज्वलनबिंदु त्या उष्णतामापक यंत्राच्या ७०° व्या अंशाहून कमी नसला ह्मणजे, ते नमुने ज्या पिट्रोलियमचे असतील तें सगळें पिट्रोलियम भयकारक नाहीं असा रिपोर्ट केला पाहिजे.

*केलेल्या तपासणीवरून पिट्रोलियमच्या प्रतींत मोठा फरक दिसून येईल तेव्हां काय करावें.*

२५. कोणत्याही कन्सैन्मेंटांतील पिट्रोलियम एकाच प्रतीचें असल्याबद्दल इकरार झालेला असून त्यांतल्या नमुन्यांच्या परीक्षेवरून तें एकाच प्रतीचें नाहीं असा संशय उत्पन्न झाला तर, त्या पिट्रोलियमपैकीं कोणतेंही पिट्रोलियम भयकारक नाहीं अशाबद्दल आपली खातरी करून घेण्यासाठीं आणखी तपासणी करणें जरूर आहे असें तपासणी-अमलदारास वाटल्यास त्यानें त्याप्रमाणें कस्टमच्या मुख्य अमलदाराला कळविलें पाहिजे.

येणेंप्रमाणें कळविण्यांत आलें ह्मणजे कस्टम्सच्या मुख्य अमलदारानें तें पिट्रोलियम जमिनीवर उतरवून त्याचे एक एक हजार पेट्यांचे गट रचवून ठेववावे अगर तें एकेका बोटींत पांच पांचशें पेट्या ह्याप्रमाणें बोटींत उतरवावें. नंतर २१ व्या कानूंत सांगितलेल्या

अमलदारानें त्या प्रत्येक गटांतून एक एक नमुना काढून तो तपासणी-अमलदाराकडे पाठवावा. अशा प्रत्येक नमुन्याची तपासणी करण्यांत येऊन तो ज्या प्रतीचा आहे ह्मणून निर्णय होईल, तीच प्रत, तो नमुना ज्या गटापैकीं असेल त्या गटांतल्या पिट्रोलियमची आहे असें समजलें पाहिजे.

तें पिट्रोलियम जर कानू ११ अन्वयें आधींच जमिनीवर उतरून सांठवून ठेविलेलें असेल, तर त्याचे निरनिराळे गट करून त्या प्रत्येक गटाचे नमुने सदरीं सांगितल्याप्रमाणें सुपरिंटेंडंट आफ पोलीस ह्यांनीं काढिले पाहिजेत.

**(इ) नमुने काढण्याबद्दल आणि त्यांची तपासणी करण्याबद्दल फी.**

२६. पिट्रोलियमचे नमुने काढण्याबद्दल आणि त्यांची तपासणी करण्याबद्दल खालीं निर्दिष्ट केलेल्या फी घेतल्या जातील:— फी.

(१) कानू २१ व २४ ह्यांअन्वयें—

काढलेल्या प्रत्येक नमुन्याबद्दल, एक रुपया.

तपासणी केलेल्या प्रत्येक नमुन्याबद्दल, एक रुपया.

(२) कानू २९ अन्वयें—

काढलेल्या प्रत्येक नमुन्याबद्दल, पांच रुपये.

तपासणी केलेल्या प्रत्येक नमुन्याबद्दल, पांच रुपये.

**साधारण अपवाद.**

२७. भयकारक नाहीं असें जें कोणतेंही पिट्रोलियम कोणत्याही तारवावर सामुग्री ह्मणून असेल, आणि जें सामुग्री ह्मणून त्या तारवाच्या सतमींत दाखल केलेलें असेल, त्याला, तें कस्टम्सच्या मुख्य अधिकाऱ्याच्या मतें गैरवाजवी वाटण्याइतकें जास्त नसल्यास, ह्या कानूंपैकीं कोणत्याही कानूंतला ठराव लागू होणार नाहीं. तारवाच्या सामुग्रींत जें वाजवी पिट्रोलियम असेल, त्यास ह्या कानू लागू नाहींत.

असें पिट्रोलियम सदहू अमलदाराच्या मतें गैरवाजवी वाटण्याइतकें जास्त असलें तर, त्या अमलदारास वाजवी वाटेल तेवढ्या पिट्रोलियमहून अधिक असलेल्या पिट्रोलियमास ह्या कानूंतले ठराव लागू होतील.

अलीजा गव्हर्नर साहेब बहादुर इन् कौन्सिल,
ह्यांच्या हुकुमावरून,
(सही.) जे. न्यूजंट,
चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True Translation.)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

# जाहिरनामा.

## रेव्हेन्यू डिपार्टमेंट.

मुक्काम बंदिरे मुंबई, तारीख ७ माहे फेब्रुवारी सन १८९३:

नंबर २७४३ व २७४३ अ तारीख २२ एप्रिल सन १८९०, सन १८९० चें मुंबई सरकारी गॅझेट, भाग १, याच्या ३४१–३४८ या पृष्ठांवर प्रसिद्ध केलेले.

**नंबर १०८४.**—सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट ह्याच्या ८ व्या व ११ व्या कलमांअन्वयें ज्या कानू करून रकान्यांत निर्दिष्ट केलेल्या जाहिरनाम्यांमध्यें प्रसिद्ध केल्या आहेत, त्या कानूंमध्यें फेरफार करण्यासाठीं आणि त्यांस पुरवणीदाखल अशा ज्या कानू त्या कलमांअन्वयें करण्याचा विचार केला आहे त्यांचा मसुदा, त्यांशीं ज्या लोकांचा संबंध असण्याचा संभव आहे त्या लोकांच्या माहितीसाठीं, याखालीं दिला आहे, आणि ह्यावरून असें फर्माविण्यांत येत आहे कीं, ह्या मसुद्याचा विचार ह्या जाहिरनाम्याच्या तारिखेपासून एका महिन्यानें केला जाईल.

### कलम ८ ह्याअन्वयें कानू.

१. सदर्हू आक्टाच्या ८ व्या कलमाअन्वयें करून जाहिरनामा नंबर २७४३, तारीख २२ एप्रिल सन १८९०, ह्यांत प्रसिद्ध केलेल्या कानूंपैकीं २ ऱ्या कानूच्या (१) रकमेंत खालीं दिलेला मजकुर जास्त दाखल करावा; तो मजकुर येणेंप्रमाणें:—

"आणि 'मोठ्या प्रमाणाचें पिट्रोलियम' ह्या संज्ञेचा अर्थ, ३०० ग्यालनांच्या अगर त्यापेक्षां मोठ्या अशा कोणत्याही पात्रांत असलेलें पिट्रोलियम, असा आहे."

२. सदर्हू कानूंपैकीं १८व्या कानूंत खालीं दिलेला मजकुर जास्त दाखल करावा: तो मजकुर येणेंप्रमाणें:—

"(२) पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें आंत आणिलेलें असेल तेव्हां, तें, सूर्योदय व सूर्यास्त ह्यांच्या दरम्यान, एकादा नळ अगर घडींव लोखंडाची एकादी नळी लावून तारवांतून किनाऱ्यावर एकदम घ्यावें, किंवा मोठ्या प्रमाणाचें पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल कलम ११ अन्वयें केलेल्या कानूंपैकीं ६ (२) ह्या कानूवरहुकम योग्य रीतीनें दाखला दिलेल्या मचव्यांत घालून आणावें. ह्याप्रमाणें आणिलेलें पिट्रोलियम पंप लावून सांठवणाच्या टाक्यांमध्यें भरावें, आणि त्या तारवांतून अगर दाखलेवाल्या मचव्यांतून पिट्रोलियम काढून घेण्याचें काम पुरें झालें ह्मणजे, तें ज्या नळ्या लावून काढिलें असेल, त्या नळ्या, किनाऱ्यावर ठेवलेल्या एका जादा पंपाच्या योगानें तावडतोब रिकाम्या कराव्या. त्या तारवांतलें अगर दाखलेवाल्या मचव्यांतलें पिट्रोलियम काढून घेण्याचें काम सूर्यास्तापर्यंत पुरें झालें नाहीं तर, तें काढण्याच्या नळींत जें पिट्रोलियम राहील तें सुटून जाऊं नये ह्मणून एकाद्या वाल्वाच्या योगानें बंदोबस्त करावा."

३. सदर्हू कानूंपैकीं २२व्या कानूच्या ऐवजीं खालीं दिलेला मजकुर दाखल करावा तो मजकुर येणेंप्रमाणें:—

"२२. तारवावरील पिट्रोलियमापैकीं प्रत्येक निशाणीच्या अगर प्रतीच्या पिट्रोलियमांतून नमुने घ्यावयाचे ते खालीं दिलेल्या प्रमाणानें घेतले पाहिजेत:—

### (१) दाखल्याचें पिट्रोलियम.

| | |
|---|---|
| (अ) पेट्यांत असलेलें. | दर १९००० अगर त्यांहून कमी पेट्यांस, एक नमुना. |
| (ब) (१) मोठ्या प्रमाणाचें अगर टांक्यांत असलेलें अगर<br>(२) पिपांत असून एकाच प्रतीचें असल्याबद्दल इकरार केलेलें. | १२०००० ग्यालनांच्या प्रत्येक खणांतून, अगर टांक्यांतून अगर एकंदर तितक्याच परिमाणाच्या अनेक खणांतून, टांक्यांतून, अगर पिपांतून, एक नमुना. |

(२).—दाखला नसलेलें पिट्रोलियम.

| | |
|---|---|
| (अ) पेट्यांत असलेलें. | दर १०००० अगर त्यांहून कमी पेट्यांस, एक नमुना. |
| (ब) (१) मोठ्या प्रमाणाचें अगर टांक्यांत असलेलें. (२) पिपांत असून एकाच प्रतीचें असल्याबद्दल इकरार केलेलें. | ८०००० अगर कमी ग्यालनांच्या प्रत्येक खणांतून अगर टांक्यांतून अगर एकंदर तितक्याच परिमाणाच्या अनेक खणांतून, टांक्यांतून अगर पिपांतून, एक नमुना." |

४. सदहूं कानूंपैकीं २९व्या कानूच्या दुसऱ्या पारिग्राफाच्या आरंभीं "येणेंप्रमाणें कळविण्यांत आल्यानंतर" असे जे शब्द आहेत, त्यांच्या ऐवजीं, "त्या कन्सैन्मेंटांतील पिट्रोलियम पेट्यांत भरलेलें असेल तेव्हां" हे शब्द दाखल करावे.

त्या पारिग्राफांत खालीं दिलेला मजकुर जास्त दाखल करावा :—

"तें कन्सैमेंट मोठ्या प्रमाणानें आणिलेलें पिट्रोलियम असेल तेव्हां; आणखी तपासणी करणें जरूर आहे असें तपासणी–अमलदारास वाटल्यास, कस्टम्सच्या मुख्य अमलदारानें, मूळ नमुना ज्या टांक्यांतून घेण्यांत आलेला होता त्यांतलें पिट्रोलियम योग्यरीतीनें ढवळल्यानंतर त्यांतला एक दुसरा नमुना घेऊन तो त्या तपासणी–अमलदाराकडे पाठविला पाहिजे, आणि त्या तपासणी–अमलदाराचा जादा रिपोर्ट येई तोंपर्यंत, त्या टांक्यांतल्या पिट्रोलियमचा कोणताही भाग जमिनीवर उतरूं देतां कामा नये. त्या दुसऱ्या नमुन्याबद्दलचा रिपोर्ट त्या पिट्रोलियमसंबंधानें असमाधानकारक झाला तर, कस्टम्सच्या मुख्य अमलदारानें त्या टांक्यांतील सगळें पिट्रोलियम भयकारक पिट्रोलियम समजून त्याप्रमाणें तजवीज करावी."

कलम ११ ह्याअन्वयें कानू.

१. सदहूं आक्टाच्या ११व्या कलमाअन्वयें करून जाहिरनामा नंबर २७४३ अ, तारीख २२ माहे एप्रिल सन १८९०, ह्यांत प्रसिद्ध केलेल्या कानूंपैकीं १ल्या कानूंत खालीं दिलेला मजकुर जास्त दाखल करावा: तो मजकुर येणेंप्रमाणें :—

"(४) मोठ्या प्रमाणाचें पिट्रोलियम ह्या संज्ञेचा अर्थ, ३०० ग्यालनांच्या अगर त्याहून मोठ्या अशा कोणत्याही पात्रांत असलेलें पिट्रोलियम, असा आहे."

२. सदहूं ११व्या कलमाअन्वयें केलेल्या सदहूं कानूंपैकीं ३ऱ्या कानूंत, (ब) रकमेच्या नंतर आणि तिच्या विशेष ठरावाच्या अगोदर, खालीं दिलेला मजकुर दाखल करावा: तो मजकुर येणेंप्रमाणें :—

"(अ) सदहूं कानूंमध्यें कोणताही ठराव असला तरी, स्थानिक सरकार, आपल्या नजरेस येईल त्याप्रमाणें आणि आपण घालून दिलेल्या शर्ती लागू करून, आपण पसंत केलेल्या प्लानांबरहुकुम आणि स्पेसिफिकेशन्सबरहुकुम मोठ्या प्रमाणाचें पिट्रोलियम सांठविण्यासाठीं मुद्दाम तयार केलेल्या जागेमध्यें कोणत्याही विवक्षित परिमाणाचें पिट्रोलियम ठेवण्यासाठीं परवाना देण्यास मुखत्यार आहे. अशा जागेतील प्रत्येक सांठवणीच्या टांक्यावर अगर इतर पात्रावर, त्यांत किती ग्यालन पिट्रोलियम मावण्याजोगें आहे तें, सहज दिसेल अशा रीतीनें लिहिलेलें असलें पाहिजे.

(ब) मोठ्या प्रमाणाचें पिट्रोलियम सांठविण्यासाठीं मुंबई बंदराच्या ट्रस्टींच्या जमिनीवर जें कोणतेंही टांकें अगर पात्र बांधण्यांत येईल, तें, ह्या कानूंअन्वयें पिट्रोलियम कबजांत ठेवण्याबद्दल परवाना दिलेली जागा आहे असें समजलें पाहिजे.

(क) भयकारक नाहीं असें मोठ्या प्रमाणाचें पिट्रोलियम प्रिन्सेस डॉकमध्यें अगर मुंबई पोर्टट्रस्टच्या दुसऱ्या एकाद्या धक्कयावर उतरावयाचें असेल तर, ह्याप्रमाणें निश्चित केलेला धक्का, जलमार्गाच्या कस्टम्सच्या आक्टाअन्वयें, मुंबई सरकारी गझेटांत, भयकारक नाहीं असें पिट्रोलियम उतरण्याचा धक्का ह्मणून जाहीर केला पाहिजे."

३. सदहू ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या सदहू कानूंपैकीं ६ व्या कानूच्या ऐवजीं खालीं दिलेला मजकुर दाखल करावा: तो मजकुर येणेंप्रमाणें :—

भयकारक पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याची मनाई आहे.

"६. (१) भयकारक पिट्रोलियम मोठ्याप्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याची अगदीं मनाई आहे.

भयकारक पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याकरितां विशेष परवाना जरूर आहे.

(२) कोणतेंही भयकारक पिट्रोलियम विशेष परवान्याशिवाय एका जागेहून दुसऱ्या जागीं नेतां कामा नये.

भयकारक नाहीं असें पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल साधारण व विशेष परवाने.

(३) ९०० ग्यालनपेक्षां जास्त असलेलें भयकारक नाहीं असें पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल साधारण अगर विशेष परवाने देण्याचा अख्त्यार आहे.

मोठ्या प्रमाणाचें नाहीं असें पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल परवाने.

(४) मोठ्या प्रमाणाचें नाहीं असें पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल तेव्हां, त्याबद्दल परवाने द्यावयाचे ते, तें पिट्रोलियम जर हवा आंत जाणार नाहीं अशा डब्यांमध्यें अगर लवकर न फुटणाऱ्या अशा इतर पात्रांमध्यें भरलेलें असेल अगर चांगल्या बूच मारलेल्या आणि फुटण्याची भीति नाहीं अशा रीतीनें काळजीपूर्वक प्याक केलेल्या बाटल्यांमध्यें घातलेलें असेल, तर मात्र देण्यांत येतील.

पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं नेंण्याबद्दल परवाने.

(५) भयकारक नाहीं असें पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असल्यास त्याबद्दलचे परवाने खालील नियमांस अनुसरून दिले जातील :—

(अ) तें पिट्रोलियम रेलवेवरून न्यावयाचें असून, तें ज्या रेलवे आड्मिनिस्ट्रेशनाच्या लैनीवरून न्यावयाचें असेल त्या रेलवे आड्मिनिस्ट्रेशनानें पसंत केलेल्या अशा टांक्याच्या वागणींत तें भरलेलें असेल तर, तें रेलवेनें एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा परवाना देण्याचा अख्त्यार आहे;

(ब) तें आगबोटींतून अगर मचव्यांतून न्यावयाचें असून, तें ज्या आगबोटींतून अगर मचव्यांतून न्यावयाचें असेल, ती आगबोट अगर तो मचवा त्या कामासाठीं योग्य असल्याबद्दल ह्या बाबतींत स्थानिक सरकारानें नेमिलेल्या अमलदाराकडून दाखला मिळालेला असेल तर, तें आगबोटींतून अगर मचव्यांतून एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा परवाना देण्याचा अख्त्यार आहे;

(क) तें गाड्यांनीं न्यावयाचें असून तें ज्या गाड्यांतून न्यावयाचें असेल त्या गाड्या त्या कामासाठीं योग्य असल्याबद्दल ह्या बाबतींत स्थानिक सरकारानें नेमिलेल्या अमलदाराकडून दाखला मिळालेला असेल तर, तें गाड्यांतून एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा परवाना देण्याचा अख्त्यार आहे.

पिट्रोलियमपासून उत्पन्न झालेला वायु काढून टाकण्याबद्दल व्यवस्था.

मात्र, तें पिट्रोलियम ज्या टांक्यांत सांठविलेलें असेल, अगर ज्या रेलवे वागणींतून, आगबोटींतून, मचव्यांतून अगर गाड्यांतून मोठ्या प्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल त्यांत पिट्रोलियमपासून उत्पन्न झालेला वायु न राहूं देण्याबद्दल सरकारास पसंत पडेल अशी तजवीज केलेली असली पाहिजे.

साधारण परवाने.

(६) (अ) भयकारक नाहीं असें पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें रेलवेनें, रस्त्यानें अगर जलमार्गानें एका जागेहून दुसऱ्याजागीं नेण्याबद्दलचे आणि मोठ्या प्रमाणाचें नाहीं

असें पिट्रोलियम गाड्यांतून मात्र एका जागेहून दुसऱ्याजागीं नेण्याबद्दलचे बारा महिन्यांच्या मुदतीचे साधारण परवाने देण्याचा अखत्यार आहे. अशा परवान्यांमध्यें, त्यांच्या धारण करणारांना, खरोखर त्यांचें स्वतःचें पिट्रोलियम, न्यावयाच्या स्थलासंबंधानें अगर परिमाणासंबंधानें निर्बंध ठेविल्याशिवाय, एका जागेहून दुसऱ्याजागीं नेण्याचा अधिकार दिलेला असेल.

(व) साधारण परवाना धारण करणारानें, त्या परवान्याअन्वयें न्यावयाच्या पिट्रोलियमाच्या प्रत्येक कन्सैन्मेंटाबरोबर, ह्या कानूंस जोडलेल्या ग नमुन्याबरहुकुम एक पास दिला पाहिजे; त्या पासामध्यें, तें पिट्रोलियम कोणत्या जागेपासून कोणत्या जागीं न्यावयाचें तें आणि तो पास किती पिट्रोलियमबद्दल आहे तें सांगितलेलें पाहिजे. अशा प्रत्येक पासावर नंबर असला पाहिजे, आणि साधारण परवान्याचा नंबर, पिट्रोलियम नेणाऱ्या गाडीवरील शेवटल्या पेटीच्या सर्वांस दिसणाऱ्या अशा भागावर अगर सर्वांस दिसेल अशा दुसऱ्या कोणत्याही रीतीनें ठळक आंकड्यांनीं मांडिला पाहिजे. पास.

(७) पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचे विशेष परवाने, ते देण्याच्या तारिखेपासून साहा महिन्यांपेक्षां जास्त नाहीं अशी जी मुदत सरकार अगर ते परवाने देणारा अमलदार ठरवील त्या मुदतीपर्यंत अमलांत राहातील: मात्र, कोणताही योग्य अमलदार त्या मुदतीच्या आंत जर तो परवाना रद्द करील तर त्या प्रसंगास सदरहू ठराव लागू होणार नाहीं. विशेष परवाने किती मुदतीपर्यंत अमलांत राहातील.

(८) पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याच्या प्रत्येक विशेष परवान्यामध्यें, तें पिट्रोलियम कोणत्या जागेहून कोणत्याजागीं न्यावयाचें तें, तो परवाना किती पिट्रोलियमबद्दल आहे तें, आणि तो परवाना किती मुदतीपर्यंत चालावयाचा तें नमूद केलेलें असलें पाहिजे. आणि त्यांत काय असलें पाहिजे.

४. सदरहू ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या सदरहू कानूंपैकीं १२व्या कानूंतला, "एक वर्षपर्यंत अमलांत राहील" ह्या शब्दांनंतरचा सगळा मजकूर रद्द केला आहे.

५. सदरहू कानूंपैकीं १४ व्या कानूंत खालीं दिलेला मजकूर जास्त दाखल करावा: तो मजकूर येणेंप्रमाणें:—

"(७) पिट्रोलियम रेलवेनें, रस्त्यानें अगर जलमार्गानें एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा बारा महिन्यांचा साधारण परवाना ... रु. १००

६. हल्लीं चालू असलेले नमुने अ, ब, क, व ड ह्यांच्या ऐवजीं खालील परिशिष्टांत दिलेले नमुने दाखल करावे.

## परिशिष्ट.

### नमुना अ.

**भयकारक पिट्रोलियम कबजांत ठेवण्याबद्दल सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट (सन १८८६ चा आक्ट १२ वा) ह्याच्या ५व्या अगर ६व्या कलमाअन्वयें द्यावयाचा परवाना.**

नंबर फी रुपये

ह्यावरून ह्यास ग्यालन भयकारक पिट्रोलियम ह्याच्या पाठीवर दिलेल्या कानूंस व शर्तींस अनुसरून खालीं वर्णन केलेल्या जागीं सांठविण्यास परवाना दिला आहे.

हा परवाना ह्याच्या तारिखेपासून एक वर्षपर्यंत अमलांत राहील; आणि हा पुनः नवीन करून द्यावा ह्मणून

सदहू वर्ष संपण्यापूर्वी निदान पंधरा दिवस अर्ज करण्यांत आला ह्मणजे तो पुनः नवीन करून देण्याचा अख्त्यार आहे.

सदरीं उल्लेख केलेल्या जागेचें वर्णनः—

(सही)

सेक्रेटरी निसबत मुंबई सरकार.

पिट्रोलियम चाळीस ग्यालनांपेक्षां जास्त नसेल तेव्हां. { अगर, म्युनिसिपल कमिशनर, मुंबई. अगर, रेसिडेंट, एडन. अगर, जिल्हा माजिस्ट्रेट.

## अ नमुन्याच्या पाठीवरील मजकुर.

### कानू.

[येथें सदहू आक्टाच्या ११व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं कानू १ ते ९ आणि १६ ह्या दाखल कराव्या.]

### शर्ती.

हा परवाना खाकील शर्तीस पात्र ठेवून दिला आहे :—

१. हा परवाना ज्या जागेच्या संबंधानें दिला आहे, त्या जागेंत ज्वालाग्राही पदार्थ मुळींच सांठवूं नयेत.

२. सदहू पिट्रोलियमच्या प्रत्येक पेटीवर (अगर डबा वगैरे ह्यावर) सदहू आक्टाच्या ७ व्या कलमांत सांगितल्याप्रमाणें नांवाची चिठ्ठी असली पाहिजे.

३. ज्या इमारतींत सदहू पिट्रोलियम सांठविलेलें असेल, त्या इमारतीच्या आंत पिट्रोलियम भरलेलें कोणतेंहीं पात्र उघडूं नये आणि कोणत्याही पात्रांतून तेल काढूं नये.

४. त्या इमारतीच्या आंत कोणत्याही वेळीं कोणत्याही प्रकारें तमाखू वगैरे ओढूं देऊं नये, दिवा लावूं देऊं नये अगर विस्तव पेटवूं देऊं नये.

५. सरकार किंवा हा परवाना देणारा अमलदार जर, हा परवाना ज्या जागेबद्दल दिलेला असेल, त्या जागेच्या सुरक्षितपणासाठीं सरकारच्या अगर त्या अमलदाराच्या मतें जरूर असलेल्या कोणत्याही मरामती करण्यास परवाना धारण करणारास लेखी नोटीस देऊन हुकुम करील, तर, त्या परवाना धारण करणारानें त्या नोटिशींत सांगितलेल्या मुदतीच्या आंत (ही मुदत ती नोटीस पोंचल्याच्या तारिखेपासून एका आठवड्यापेक्षां कमी नसावी) त्या मरामती केल्या पाहिजेत.

६. हा परवाना धारण करणारानें, ह्या परवान्यांत दाखल केलेल्या पिट्रोलियमांतून तीन ग्यालन पेक्षां जास्त पिट्रोलियम, सदहू आक्टाच्या ५ व्या किंवा ६ व्या कलमाअन्वयें तितकें पिट्रोलियम कबज्यांत ठेवण्यास ज्या मनुष्यास परवाना मिळालेला नसेल, त्या कोणत्याही मनुष्याच्या स्वाधीन करूं नये. त्याला जर त्यांतून तीन ग्यालनांपेक्षां जास्त नाहीं इतकें पिट्रोलियम कोणत्याही मनुष्याच्या स्वाधीन करावयाचें असलें, तर त्यानें सदहू आक्टाच्या ६व्या कलमाच्या विशेष ठरावांत असें पिट्रोलियम ज्या पात्रांत घालावयाचें त्या पात्राच्या संबंधानें जे ठराव आहेत, त्यांस अनुसरून वागलें पाहिजे.

---

## नमुना ब.

**भयकारक पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट (सन १८८६ चा आक्ट १२ वा) ह्याच्या ५ व्या अगर ६ व्या कलमाअन्वयें द्यावयाचा विशेष परवाना.**

नंबर फी रुपये

ह्यावरून राहाणार ह्यास, सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट, कलम ह्याअन्वयें, एकंदर ग्यालन भयकारक पिट्रोलियम भरलेल्या पेट्या (किंवा डबे वगैरे, जसें असेल तसें,) ह्याच्या पाठीवर दिलेल्या कानूंस व शर्तींस अनुसरून खालीं निर्दिष्ट केलेल्या मार्गानें येथून येथें पाठविण्यास परवाना दिला आहे: तो मार्ग येणेंप्रमाणें :—

प्रत्येक पेटींत (किंवा डबा वगैरे ह्यांत) पिट्रोलियम किती आहे तें खालीं नमूद केलें आहे :—

हा परवाना तारीख माहे सन १८९ पर्यंत मात्र अमलांत राहील.

(सही)

सेक्रेटरी निसबत सरकार.

पिट्रोलियम चाळीस ग्यालनांपेक्षां अधिक नसेल तेव्हां.
{ अगर, मुंबईचे पोलीस कमिशनर किंवा डेप्युटी कमिशनर.
अगर, रेसिडेंट, एडन.
अगर, जिल्हा माजिस्ट्रेट.

---

**ब नमुन्याच्या पाठीवरील मजकूर.**

**कानू.**

[ येथें सदर्हू आक्टाच्या ११ व्या कलमाखालीं केलेल्या कानूंपैकीं कानू १, २, ६ आणि १६ ह्या दाखल कराव्या].

**शर्ती.**

हा परवाना खालील शर्तींस पात्र ठेवून दिला आहे:—

१. सदर्हू पिट्रोलियम सदर्हू आक्टाच्या ७व्या कलमावरहुकुम नांवाच्या चिठ्ठ्या मारलेल्या पात्रांमध्यें असलें पाहिजे.

२. सदर्हू पिट्रोलियम ( येथें वाहानाचा प्रकार दाखल करावा ) नें नेलें पाहिजे.

३. सदर्हू पिट्रोलियम आगबोटीनें नेण्यांत येईल तेव्हां, तें, परवाना देणारा अमलदार अगर ह्या बाबतींत तो ज्या दुसऱ्या कोणत्याही अमलदाराला लेखी हुकुम करून अधिकार देईल तो अमलदार त्या आगबोटीचा जो भाग पसंत करील त्या भागांत त्यानें पसंत केलेल्या रीतीनें सांठविलें पाहिजे.

४. सदर्हू पिट्रोलियम रेलवेनें नेण्यांत येईल तेव्हां, तें ज्या लैनीवरून अगर लैनींवरून न्यावयाचें असेल, त्या लैनीचे अगर लैनींचे रेलवे अधिकारी वेळोवेळीं त्यासंबंधानें ज्या सामान्य अगर विशेष कानू करितील त्या सर्व कानूंस तें पात्र राहील.

५. सदर्हू पिट्रोलियम होडीनें नेण्यांत येत असेल तेव्हां, ती होडी जोंपर्यंत एडनखेरून सगळ्या मुंबई इलाक्यांतील कोणत्याही बंदराच्या हद्दींच्या आंत असेल तोंपर्यंत तीवर कोणत्याही प्रकारें तमाखू वगैरे ओढूं देऊं नये, दिवा लावूं देऊं नये अगर विस्तव पेटवूं देऊं नये. शिवाय, तें पिट्रोलियम ज्या होडींत असेल त्या होडीवर, तिच्या मागच्या भागीं, सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत, अठरा इंच लांब व बारा इंच रुंद असा एक तांबडा बावटा लावलेला असला पाहिजे आणि त्यावर "Petroleum Boat" [ पिट्रोलियम बोट ] हे शब्द काळ्या अक्षरांनीं लिहिलेले असले पाहिजेत.

६. सदर्हू पिट्रोलियम गाडीनें नेण्यांत येत असेल तेव्हां ज्या गाडींत तें असेल ती गाडी सूर्यास्तानंतर अगर सूर्योदयापूर्वी चालवूं नये व तिच्यावर दिवा मुळींच असूं नये.

७. ज्या मनुष्याजवळ सदर्हू आक्टाच्या ९ व्या अगर ६ व्या कलमाखालीं दिलेला परवाना नसेल, त्या मनुष्याच्या स्वाधीन ३ ग्यालन पेक्षां जास्त पिट्रोलियम करण्याची हा परवाना धारण करणारास मनाई आहे; आणि त्यापेक्षां कमी पिट्रोलियम स्वाधीन करणें तें, तें पिट्रोलियम कोणत्या प्रकारच्या पात्रांत ठेविलें पाहिजे त्याबद्दल सदर्हू आक्टाच्या ६ व्या कलमाच्या विशेष ठरावांत ज्या अटी सांगितल्या आहेत, त्या पुऱ्या करण्यांत आल्याशिवाय स्वाधीन करूं नये.

---

## नमुना क.

**भयकारक नाहीं असें पिट्रोलियम कबजांत ठेवण्याबद्दल सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट ( सन १८८६ चा १२ वा ) ह्याच्या १० व्या कलमाअन्वयें द्यावयाचा परवाना.**

नंबर फी रुपये

ह्यावरून ह्यास भयकारक पिट्रोलियम नाहीं असें ग्यालन पिट्रोलियम खालीं वर्णन केलेल्या जागेंत ह्याच्या पाठीवर दिलेल्या कानूंस आणि शर्तींस अनुसरून ठेवण्याचा परवाना दिला आहे.

हा परवाना तारीख माहे सन १८९ पर्यंत मात्र अमलांत राहील.

सदरीं उल्लेख केलेल्या जागेचें वर्णन :—

(सही)

म्युनिसिपल कमिशनर, मुंबई.

अगर, रेसिडेंट, एडन.

अगर, जिल्हा माजिस्ट्रेट.

तारीख माहे सन १८९

---

**क नमुन्याच्या पाठीवरील मजकुर.**

**कानू.**

[ येथें सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट, कलम ११, ह्याखालीं केलेल्या कानू १, २, ३, ४, ९, आणि १६, ह्या दाखल कराव्या.]

**शर्ती.**

हा परवाना परवाना खालील शर्तींस पात्र ठेवून दिला आहे :—

१. हा परवाना ज्या जागेसंबंधानें दिला आहे, त्या जागेंत ज्वालाग्राही पदार्थ मुळींच सांठवूं नयेत.

२. ज्या इमारतींत सदहू पिट्रोलियम सांठविलेलें असेल, त्या इमारतीच्या आंत पिट्रोलियम भरलेलें कोणतेंही पात्र उघडूं नये आणि कोणत्याही पात्रांतून तेल काढूं नयें.

३. त्या इमारतीच्या आंत कोणत्याही वेळीं कोणत्याही प्रकारें तमाखू वगैरे ओढूं देऊं नये, दिवा लावूं देऊं नये अगर विस्तव पेटवूं देऊं नये.

४. परवाना देणारा अमलदार जर, हा परवाना ज्या जागेबद्दल दिलेला असेल त्या जागेच्या सुरक्षितपणासाठीं आपल्यामतें जरूर असलेल्या कोणत्याही मरामती करण्यास परवाना धारण करणारास लेखी नोटीस देऊन हुकुम करील, तर, त्या परवाना धारण करणारानें त्या नोटिशींत सांगितलेल्या मुदतीच्या आंत ( ही मुदत ती नोटीस पोंचण्याच्या तारिखेपासून एका आठवड्यापेक्षां कमी नसावी ) त्या मरामती केल्या पाहिजेत.

---

## नमुना ड.

**भयकारक नाहीं असें पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें कबजांत ठेवण्याबद्दल सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट ( सन १८८६ चा १२ वा ) ह्याच्या १० व्या कलमाअन्वयें द्यावयाचा परवाना.**

नंबर फी रुपये

ह्यावरून ह्यास, ग्यालन पिट्रोलियम खालीं वर्णन केलेल्या जागेंत, ह्याच्या पाठीवर दिलेल्या कानूंस आणि शर्तींस अनुसरून सांठवण्याचा परवाना दिला आहे.

सदरीं उल्लेख केलेल्या जागेचें वर्णन :—

म्युनिसिपल कमिशनर, मुंबई.

अगर, रेसिडेंट, एडन.

अगर, जिल्हा माजिस्ट्रेट.

तारीख माहे सन १८९

---

**ड नमुन्याच्या पाठीवरील मजकुर.**

**कानू.**

[ येथें सदहू आक्टाच्या ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं १, २, ३, ४, ९ व १६ ह्या कानू दाखल कराव्या.]

शर्ती.

[ येथें, ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं ३ अ ह्या कानूवरहुकुम स्थानिक सरकारानें प्लान व स्पेसिफिकेशन्सबद्दल ज्या शर्ती घातलेल्या असतील, त्या दाखल कराव्या].

## नमुना ई.

### भयकारक नाहीं असें पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट ( सन १८८६ चा १२ वा ) ह्याच्या १० व्या कलमाअन्वयें द्यावयाचा विशेष परवाना.

नंबर फी रुपये

ह्यावरून ह्यास पेट्या

* मिळून ग्यालन पिट्रोलियम येथून

येथें, ह्याच्या पाठीवर दिलेल्या कानूंस आणि शर्तींस अनुसरून नेण्याचा परवाना दिला आहे.

हा परवाना तारीख माहे सन १८९ पर्यंत अमलांत राहील.

तारीख माहे सन १८९ .

मुंबईचे पोलिस कमिशनर अगर डेप्युटी कमिशनर.
अगर, रेसिडेंट, एडन.
अगर, जिल्हा माजिस्ट्रेट.

### ई नमुन्याच्या पाठीवरील मजकुर.

कानू.

[ येथें, सदर्हू आक्टाच्या ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं कानू १, २, ६ आणि १६ ह्या दाखल कराव्या. ]

शर्ती.

हा परवाना खालीं दिलेल्या शर्तींस पात्र ठेवून दिला आहे :—

**सदर्हू पिट्रोलियम आगबोटीनें नण्यांत येईल तेव्हां.**

१. तें पिट्रोलियम, परवाना देणारा अमलदार अगर ह्या बाबतींत तो ज्या दुसऱ्या कोणत्याही अमलदाराला लेखी हुकुम करून अधिकार देईल तो अमलदार त्या आगबोटीचा जो भाग पसंत करील त्या भागांत, त्यानें पसंत केलेल्या रीतीनें सांठविलें पाहिजे.

**सदर्हू पिट्रोलियम होडीनें नेण्यांत येईल तेव्हां.**

२. तें पिट्रोलियम ज्या होडीनें नेण्यांत येत असेल, त्या होडीवर कोणत्याही प्रकारें तमाखू वगैरे ओढूं देऊं नये दिवा लावूं देऊं नये, अगर विस्तव पेटवूं देऊं नये.

३. शिवाय, तें पिट्रोलियम नेणाऱ्या होडीवर, तिच्या मागच्या भागीं, सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत, अठरा इंच लांब व बारा इंच रुंद असा एक तांबडा बावटा लाविला असला पाहिजे आणि त्यावर "Petroleum Boat' [ पिट्रोलियम बोट ] हे शब्द काळ्या अक्षरांनीं लिहिलें असले पाहिजेत.

**सदर्हू पिट्रोलियम गाडीनें नेण्यांत येईल तेव्हां.**

४. तें पिट्रोलियम ज्या गाडीनें नेण्यांत येत असेल, ती गाडी सूर्यास्तानंतर अगर सूर्योदयापूर्वीं चालवूं नये व तिच्यावर दिवा मुळींच असूं नये

**सदर्हू पिट्रोलियम रेलवेनें नेण्यांत येईल तेव्हां.**

५. तें पिट्रोलियम ज्या लैनीवरून अगर लैनींवरून न्यावयाचें असेल, त्या लैनीचे अगर लैनींचे रेलवे अधिकारी वेळोवेळीं त्यासंबंधानें ज्या सामान्य अगर विशेष कानू करितील त्या सर्व कानूंस तें पात्र राहील.

* पिट्रोलियम मोघ्याप्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल तेव्हां " पेट्या मिळून " हे शब्द गाळावे.

६. हा परवाना मोठ्या प्रमाणाच्या पिट्रोलियमबद्दल दिलेला असेल तेव्हां, सदर्हू तेल ज्या आगबोटीनें, मचव्यानें, गाडीनें अगर रेल्वे वागणीनें न्यावयाचें असेल त्या आगबोटीबद्दल, मचव्याबद्दल, गाडीबद्दल अगर रेल्वेवागणीबद्दल कलम ११ अन्वयें केलेल्या कानूंपैकीं ६ व्या कानूंत सांगितल्याप्रमाणें योग्य रीतीचा दाखला असला पाहिजे. मोठ्याप्रमाणाचें नाहीं असें पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल हा परवाना देण्यांत येईल तेव्हां, तें पिट्रोलियम, सदरील ६ व्या कानूंत सांगितल्याप्रमाणें, हवा आंत जाणार नाहीं अशा डब्यांमध्यें अगर लवकर फुटणार नाहींत अशा इतर पात्रांमध्यें भरलेलें असलें पाहिजे अगर चांगल्या बूच मारिलेल्या आणि फुटण्याची भिति नाहीं अशा रीतीनें काळजी-पूर्वक प्याक केलेल्या बाटल्यांमध्यें घातलेलें असलें पाहिजे.

७. हा परवाना त्यावर निर्दिष्ट केलेल्या मार्गासंबंधानें मात्र कायदेशीर समजला जाईल, आणि तो, तें पिट्रोलियम एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याच्या कामीं ज्या रेल्वेचा अगर वाहून नेण्याचें काम करण्याच्या ज्या इतर मंडळीचा अगर मनुष्याचा उपयोग केलेला असेल, तीकडे अगर त्याकडे हजर केला पाहिजे; आणि ज्या मुदतीपर्यंत तो कायदेशीर असेल ती मुदत संपतांच, तो, परवाना देण्याऱ्या अधिकाऱ्याकडे परत दिला पाहिजे.

---

## नमुना फ.

**भयकारक नाहीं असें पिट्रोलियम गाडीनें (अगर मोठ्या प्रमाणानें, जसें असेल तसें) एका जागे-हून दुसऱ्या जागीं नेण्याबद्दल सन १८८६ चा पिट्रोलियम आक्ट (सन १८८६ चा १२ वा), कलम १०, ह्याअन्वयें द्यावयाचा साधारण परवाना.**

कानू ६ (अ) पाहा.

नंबर.

फी रुपये १००

ह्यावरून ह्यास, भयकारक नाहीं असें पिट्रोलियम (गाडीनें, अगर मोठ्या प्रमाणानें, जसें असेल * तसें,) ह्याच्या पाठीवर दिलेल्या कानू व शर्ती ह्यांस अनुसरून मुंबई इलाक्यांत एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा साधारण परवाना दिला आहे.

हा परवाना तारीख माहे सन १८९ पावेतों अमलांत राहील.

तारीख माहे सन १८९ . { मुंबईचे पोलीस कामिशनर अगर डेप्युटी कमिशनर.<br>अगर, रेसिडेंट एडन.<br>अगर, जिल्हा माजिस्ट्रेट.

---

### फ नमुन्याच्या पाठीवरील मजकूर.

कानू.

[येथें, सदर्हू आक्टाच्या ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं कानू १, २, ६, आणि १६ ह्या दाखल कराव्या.]

### शर्ती.

**सदर्हू पिट्रोलियम आगबोटीनें नेण्यांत येईल तेव्हां.**

१. तें पिट्रोलियम, परवाना देणारा अमलदार अगर ह्या बाबतींत तो ज्या दुसऱ्या कोणत्याही अमलदाराला लेखी हुकुम करून अधिकार देईल तो अमलदार त्या आगबोटीचा जो भाग पसंत करील त्या भागांत, त्यानें पसंत केलेल्या रीतीनें सांठविलें पाहिजे.

---

*पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल तर तें कोणत्या रीतीनें न्यावयाचें तें निर्दिष्ट करावें.

### सदहू पिट्रोलियम होडीनें नेण्यांत येईल तेव्हां.

२. तें पिट्रोलियम ज्या होडीनें नेण्यांत येत असेल, त्या होडीवर कोणत्याही प्रकारें तमाखू वगैरे ओढूं देऊं नये, दिवा लावूं देऊं नये अगर विस्तव पेटवूं देऊं नये.

३. तें पिट्रोलियम नेणाऱ्या होडीवर, तिच्या मागच्या भागीं, सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत, अठरा इंच लांब व बारा इंच रुंद असा एक तांबडा बावटा लावलेला असला पाहिजे; आणि त्यावर "Petroleum Boat" [पिट्रोलियम बोट] हे शब्द काळ्या अक्षरांनीं लिहिलेले असले पाहिजेत.

### सदहू पिट्रोलियम गाडीनें नेण्यांत येईल तेव्हां.

४. तें पिट्रोलियम ज्या गाडीनें नेण्यांत येत असेल, ती गाडी सूर्यास्तानंतर अगर सूर्योदयाच्या आधीं चालवूं नये व तिच्यावर दिवा मुळींच असूं नये.

### सदहू पिट्रोलियम रेलवेनें नेण्यांत येईल तेव्हां.

५. तें पिट्रोलियम ज्या लैनीवरून अगर लैनींवरून न्यावयाचें असेल, त्या लैनीचे अगर लैनींचे रेलवे अधिकारी वेळोवेळीं त्यासंबंधानें ज्या सामान्य अगर विशेष कानू करितील त्या सर्व कानूंस तें पात्र राहील.

६. परवान्याचा नंबर गाडीवरील शेवटल्या पेटीच्या सर्वांस दिसणाऱ्या भागावर अगर सर्वांस दिसे अशा दुसऱ्या कोणत्याही रीतीनें ठळक आंकड्यांनीं मांडिला पाहिजे.

७. हा परवाना मोठ्या परिमाणाच्या पिट्रोलियमबद्दल देण्यांत आला असेल तेव्हां, तें तेल ज्या आगबोटींतून, मचव्यांतून, गाडींतून अगर रेलवे वागणींतून एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल, त्या आगबोटीबद्दल, मचव्याबद्दल, गाडीबद्दल, अगर रेलवे वागणीबद्दल, ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं ६ व्या कानूंत ठराव असल्याप्रमाणें योग्य परवाना असला पाहिजे.

मोठ्या प्रमाणाचें नाहीं अशा पिट्रोलियमबद्दल हा परवाना देण्यांत येईल तेव्हां, तें पिट्रोलियम, सदरील ६ व्या कानूंत सांगितल्याप्रमाणें, हवा आंत जाणार नाहीं अशा डब्यांमध्यें अगर लवकर न फुटणाऱ्या अशा इतर पात्रांमध्यें भरलेलें असलें पाहिजे, अगर चांगल्या बूच मारलेल्या व फुटण्याची भीति नाहीं अशा रीतीनें काळजीपूर्वक प्याक केलेल्या बाटल्यांमध्यें घातलेलें असलें पाहिजे.

---

## नमुना ग.

### भयकारक पिट्रोलियम नाहीं असें पिट्रोलियम गाडीनें (अगर, मोठ्या प्रमाणानें, जसें असेल तसें,) एका जागेहून दुसऱ्या जागीं नेण्याचा साधारण परवाना नंबर धारण करणारानें, द्यावयाचा पास.

नंबर

ह्याच्या खऱ्या मालकीचें *पेट्या मिळून ग्यालन पिट्रोलियम

येथून येथें नेण्यांत येईपर्यंत त्याबद्दल हा पास चालेल.

तारीख माहे सन १८९ .

साधारण परवाना नंबर धारण करणार.

---

### ग नमुन्याच्या पाठीवरील मजकूर.

#### शर्ती.

१. सदहू पिट्रोलियम ज्या साधारण परवान्याबरहुकुम नेण्यांत येत असेल, त्या साधारण परवान्याचा नंबर, गाडीवरील शेवटच्या पेटीच्या सर्वांत दिसणाऱ्या भागावर अगर सर्वांस दिसे अशा दुसऱ्या कोणत्याही रीतीनें ठळक आंकड्यांनीं मांडिला पाहिजे.

---

*पिट्रोलियम मोठ्या प्रमाणानें एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल तेव्हां " पेट्या मिळून " हे शब्द गाळावे.

### सदर्हू पिट्रोलियम आगबोटीनें नेण्यांत येईल तेव्हां.

२. तें पिट्रोलियम, परवाना देणारा अमलदार अगर ह्या बाबतींत तो ज्या कोणत्याही दुसऱ्या अमलदाराला लेखी हुकुम करून अधिकार देईल तो अमलदार त्या आगबोटीचा जो भाग पसंत करील, त्या भागांत, त्यानें पसंत केलेल्या रीतीनें सांठविलें पाहिजे.

### सदर्हू पिट्रोलियम होडीनें नेण्यांत येईल तेव्हां.

३. तें पिट्रोलियम ज्या होडीनें नेण्यांत येत असेल, त्या होडीवर कोणत्याही प्रकारें तमाखू वगैरें ओढूं देऊं नये, दिवा लावूं देऊं नये अगर विस्तव पेटवूं देऊं नये. तें पिट्रोलियम नेणाऱ्या होडीवर, तिच्या मागच्या भागीं, सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत, अठरा इंच लांब व बारा इंच रुंद असा एक तांबडा बावटा लावलेला असला पाहिजे, आणि त्यावर "Petroleum Boat" [ पिट्रोलियम बोट ] हे शब्द काळ्या अक्षरांनीं लिहिलेले असले पाहिजेत.

### सदर्हू पिट्रोलियम गाडीनें नेण्यांत येईल तेव्हां.

४. तें पिट्रोलियम ज्या गाडीनें नेण्यांत येत असेल, ती गाडी सूर्यास्तानंतर अगर सूर्योदयापूर्वीं चालवूं नये व तिच्यावर दिवा मुळींच असूं नये.

### सदर्हू पिट्रोलियम रेलवेनें नेण्यांत येईल तेव्हां.

५. तें पिट्रोलियम ज्या लैनींवरून अगर लैनीवरून न्यावयाचें असेल, त्या लैनीचे अगर लैनींचे रेलवे अधिकारी वेळोवेळीं त्यासंबंधानें ज्या सामान्य अगर विशेष कानू करितील, त्या सर्व कानूंस तें पात्र राहील.

६. हा परवाना मोठ्या प्रमाणाच्या पिट्रोलियमबद्दल देण्यांत आला असेल तेव्हां, तें तेल ज्या आगबोटींतून, मचव्यांतून, गाडींतून अगर रलवे वागणींतून एका जागेहून दुसऱ्या जागीं न्यावयाचें असेल, त्या आगबोटीबद्दल, मचव्याबद्दल, गाडीबद्दल, अगर रेलवे वागणीबद्दल, ११ व्या कलमाअन्वयें केलेल्या कानूंपैकीं ६ व्या कानूंत ठराव असल्याप्रमाणें योग्य परवाना असला पाहिजे. मोठ्या प्रमाणाचें नाहीं अशा पिट्रोलियमबद्दल हा परवाना देण्यांत येईल तेव्हां, तें पिट्रोलियम, सदरील ६ व्या कानूंत सांगितल्याप्रमाणें हवा आंत जाणार नाहीं अशा डब्यांमध्यें अगर लवकर न फुटणाऱ्या अशा इतर पात्रांमध्यें भरलेलें असलें पाहिजे, अगर चांगल्या बूच मारलेल्या व फुटणार नाहींत अशा रीतीनें काळजीपूर्वक प्याक केलेल्या बाटल्यांमध्यें घातलेलें असलें पाहिजे.

आलीजा गव्हर्नर साहेब बहादुर
इन् कौन्सिल ह्यांच्या हुकुमावरून,
(सही) टी. डी. म्याकेंझी,
चीफ सेक्रेटरी निसबत सरकार.

(True Translation.)
M. A. BAIG,
Oriental Translator to Government.

# लेजिस्लेटिव डिपार्टमेंट.

हिंदुस्तानचे गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल ह्यांचा खालीं लिहिलेला आक्ट नामदार गव्हर्नर जनरल ह्यांनीं तारीख १० माहे आगस्ट सन १८९३ रोजीं मंजूर केला; तो लोकांस जाहीर होण्यासाठीं ह्यावरून प्रसिद्ध केला असे:—

## सन १८९३ चा आक्ट नंबर ९.

### सन १८८२ चा तदनंतरच्या आक्टांबरहुकुम सुधारलेला हिंदुस्तानचा तारिफासंबंधी आक्ट सुधारण्याबाबत आक्ट.

सन १८८२ चा तदनंतरच्या आक्टांबरहुकुम सुधारलेला हिंदुस्तानचा तारिफासंबंधी आक्ट सुधारणें ज्याअर्थीं योग्य आहे, त्याअर्थीं, खालीं लिहिल्याप्रमाणें ठरविण्यांत येत आहे:—

सुकी आणि ताजी खारी मासळी ब्रह्मदेशांत आणणें.

१. सदर्हू आक्टांतल्या दुसऱ्या परिशिष्टांत ४ थ्या (मिठासंबंधी) नंबरानंतर खालीं दिलेला मजकूर ह्या कलमावरून दाखल करावा: तो मजकूर येणेंप्रमाणें:—

| नंबर. | पदार्थांचीं नांवें. | प्रत्येकीं | तारिफाप्रमाणें किंमत. | जकातीचा दर. |
|---|---|---|---|---|
| ४ अ. | ब्रिटिश हिंदुस्तनाच्या हद्दीबाहेरील कोणत्याही जागेहून ब्रह्मदेशांत आणिलेली सुकी खारी मासळी आणि ताजी खारी मासळी. | ८२$\frac{2}{7}$ अव्हायर्डुपाइज पौंड वजनाच्या हिंदुस्तानी मणास. | | गव्हर्नर जनरल इन् कौन्सिल हे इंडिया गझेटांत जाहिरनामा देऊन, वेळोवेळीं, बारा आण्यांपेक्षां जास्त नाहीं असा जो किंवा जे दर ठरवितील तो किंवा ते दर. |

तांदुळाचें पीठ बाहेर पाठविणें.

२. सदर्हू आक्टाच्या तिसऱ्या परिशिष्टाच्या पहिल्या आसनांतील "तांदूळ अथवा भात" ह्या शब्दांनंतर "आणि तांदुळाचें पीठ" हे शब्द ह्या कलमावरून दाखल करावे.

(सही) एस्. हार्वे जेम्स,
सेक्रेटरी निसबत हिंदुस्तान सरकार.

(True Translation.)

M. A. BAIG,
Oriental Translator to Government.


BOMBAY: PRINTED AT THE GOVERNMENT CENTRAL PRESS.